





दैनिक

महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■








●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक १३९ ●मंगळवार, दि. १९ ऑगस्ट २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955


# वाल्मीक कराडच्या जामिनावर विशेष मकोका न्यायालयात जोरदार खंडाजंगी

## तीन तास सुनावणी; ३० ऑगस्टला जामिनावर फैसला !

### वाल्मीक कराडच्या वकिलाने अटक बेकायदेशीर असल्याचा केला युक्तिवाद ; जामीन देण्यास विशेष सरकारी वकील उज्वल निकम यांचा जोरदार विरोध

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाची विशेष मकोका कोर्टात सुनावणी झाली. त्यात आरोपींच्या वकिलांनी आपल्या अशिलांचा या प्रकरणाशी कोणताही संबंध नसल्याचा दावा करत त्यांना जाम ीन मंजूर करण्याची विनंती केली. पण फिर्यादी पक्षाने हे अत्यंत गंभीर प्रकरण ▶▶ उर्वरित पान २ वर



### • विष्णू चाटे हाच वाल्मीकचा राईट हँड

यावेळी आरोपी विष्णू चाटे याच्याही वकिलांनी आपली बाजू मांडली. आपल्या अशिलावर कोणताही गुन्हा दाखल नसल्याचा दावा त्यांनी केला. पण उज्वल निकम यांनी त्यांच्या या दाव्यावरही जोरदार हरकत नोंदवली. विष्णू चाटे हा वाल्मीक कराडचा राईट हँड आहे. त्याने वाल्मीकला पूर्ण मदत केली. त्यामुळे मकोका कायद्याच्या तरतुदी या गुन्ह्याला लागू होतात आरोपीला नाही, असे ते म्हणाले. यावेळी त्यांनी विष्णू चाटेची गुन्हेगारी पार्श्वभूमीच कोर्टापुढे मांडत आरोपीचा दोषमुक्तीचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली. यामुळे विष्णू चाटेच्या वकिलांची चांगलीच पंचाईत झाली.

# लिंगी नदीच्या पुलावरून बुलेरो गाडी वाहून गेली

## एकाचा मृत्यू; तिघांना वाचवण्यास एनडीआरएफ टीमला यश

परळी । प्रतिनिधी

मागील तीन दिवसापासून बीड जिल्ह्यात त सर्वत्र मुसळधार पाऊस होत असल्याने १४ परिमंडळ क्षेत्रात पूरस्थिती निर्माण झाली आहे. मुसळधार पावसामुळे हजारो हेक्टर जमीन पाण्याखाली आली असून नदी नाले तुडुंब भरले आहेत. जिल्हा प्रशासनाच्या वतीने नदी नाले पार करताना विशेष काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले असून परळी तालुक्यातील कोडगाव येथील लिंगी नदीला पूर आल्याने पुलावरून जात असलेली



बुलेरो गाडी वाहून गेली यामध्ये एकाचा मृत्यू झाला असून तिघांना वाचवण्यात एनडीआरएफ टीमला यश आले आहे. रात्रीपासून परळी तालुक्यात झालेल्या पावसामुळे नदी नाले तुडुंब भरून वाहत आहेत प्रशासनाने वेळोवेळी त्या त्या भागात अलर्ट राहण्याच्या आदेश दिले आहेत. कौडगाव हुडा ता परळी वै येथील नदीमधे एक चारचाकी गाडी पुराच्या पाण्यात वाहून गेली. गाडीतील चार व्यक्तीपैकी दोन व्यक्ती झाडावर बसले आहेत. एसडीओ, डीवायएसपी, तहसीलदार व एपीआय घटनास्थळी हजर आहेत. पाण्याचा प्रवाह जोरात आहे. पाऊस चालू आहे. आपदग्रस्त व्यक्तीना प्रशासनाच्या व गावकऱ्याच्या वतीने बाहेर काढणेचे प्रयत्न चालू आहेत.

▶▶ उर्वरित पान २ वर

# शासनाने अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी: राजेंद्र मस्के



### ● तात्काळ पंचनामे करा

बीड । प्रतिनिधी

मे महिन्यात पडलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांचा फायदा झाला. परंतु १३ ऑगस्ट पासून सुरू झालेल्या अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील १७ महसूल मंडळांत ▶▶ उर्वरित पान २ वर

# बकरवाडी येथे बाजीराव दादा चव्हाण यांच्या पुढाकारातून मोफत छत्री वाटप



बकरवाडी । प्रतिनिधी

युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव (दादा) चव्हाण यांच्या पुढाकारातून बकरवाडी येथे मोफत शिवसेना छत्री वाटप कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या उपक्रमाचे उद्घाटन गोरक्षनाथ टेकडी संस्थानचे ह.भ.प. नवनाथ बाबा महाराज यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

गावातील नागरिकांना उन्हाळी व पावसाळी दिवसांत उपयोगी पडाव्यात या उद्देशाने मोफत छत्र्यांचे वाटप करण्यात आले. या सामाजिक उपक्रमाला गावकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद ▶▶ उर्वरित पान २ वर

# पावसाच्या पुराच्या पाण्यातुन राजापूरकरांचा जीवघेणा प्रवास

## तलवाडा परिसरात तीन दिवसापासून पावसाची हजेरी ;ओढे, नाले जलमय



तलवाडा । प्रतिनिधी

तीन दिवसापासून सुरू असलेल्या पावसामुळे राजापूर येथील कापसाच्या पुलावर पाणी आल्याने राजापूर करांना आपला जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत असून वाहने अद्याप ही बंद आहेत.या पुलाचे काम व्हावे ही ▶▶ उर्वरित पान २ वर

## मुलीचा शोध घेण्यासाठी कुटुंबाचे आंदोलन जिल्हाधिकारी कार्यालय समोर उपोषण सुरू

बीड । प्रतिनिधी

माझ्या मुलीचा शोध घेण्यात यावा या मागणीसाठी भरपावसात आष्टी तालुक्यातील एका कुटुंबाने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन सुरू केले आहे. यामुळे आतातरी प्रशासन या पालकाची हाक ऐकणार का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. आष्टी तालुक्यातील हिवरा येथील संतोष लवांडे हे आजपासून (दि.१८) जिल्हाधिकारी कार्यालय समोर कुटुंबासह उपोषणाला बसले आहेत. त्यांच्या अल्पवयीन मुलीला कोणीतरी पळवून नेल्याची त्यांनी तक्रार करुनही शोध घेण्यात येत नसल्याने मुलीचा शोध घेऊन न्याय ▶▶ उर्वरित पान २ वर

# बीड शहरातील रस्त्यांचे वाटोळे

## क्षीरसागर बंधू सह स्थानिक नेते घेऊ लागले श्रेय! श्रेय घेण्यापेक्षा बीड शहराचा विकास करुण दाखवावा : ॲड शेख शफीक

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे नागरिक त्रस्त असताना, स्थानिक नेते आणि क्षीरसागर बंधूंवर श्रेयवादाचा आरोप करत, मा खचखच् बीड जिल्हा अध्यक्ष ॲड शफीक भाऊ यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बीडच्या विकासासाठी दिलेल्या १०० कोटींच्या निधीचा वापर खरोखरच विकासासाठी होणार की स्वतःच्या राजकीय फायद्यासाठी, असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत बीडकरांनी या नेत्यांना जागा दाखवावी, असे आवाहनही त्यांनी केले आहे.



रस्त्यांचे हाल आणि नागरिकांचा संताप- बीड शहरातील रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे.

# 25 ऑगस्टला जिल्हाधिकारी कार्यालयावर कामगारांचा भव्य मोर्चा

बीड । प्रतिनिधी

आर.सी.सी. बांधकाम काम गार संघटनेच्या विविध प्रलंबित म ागण्या तातडीने निकाली काढाव्यात, अन्यथा २५ ऑगस्ट २०२५ रोजी हजारो कामगारांसह जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे भव्य मोर्चा



काढण्यात येईल, असा इशारा संघटनेने दिला आहे.संघटनेतर्फे जिल्हाधिकारी यांना सादर केलेल्या निवेदनात २४ ऑगस्टपर्यंत मागण्या मान्य न केल्यास मोर्चा काढण्याचा इशारा देण्यात आला आहे.

▶ उर्वरित पान २ वर






## थोडक्यात...

### मराठवाड्यात १ लाख ११ हजार ४२०.५५ हेक्टरवरील शेतीचं नुकसान, शेतकऱ्याने फोडला हंबरडा



मुंबई । प्रतिनिधी

राज्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे मराठवाडा, विदर्भात शेतक-यांचं मोठं नुकसान झालं आहे. हातातोंडाशी आलेला घास पावसामुळे मातीमोल झाला आहे. धाराशिव, यवतमाळ, अकोला, बीडमध्ये अतिवृष्टीमुळे पिक अक्षरक्षा आडवी झाली आहेत. मागील दोन दिवसांपासून राज्यभरात मुसळधार पावसानं हजेरी लावली आहे. अनके ठिकाणी झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतक-यांनी पीकवलेले हिरवंगार सोनं हे मातीमोल झालं आहे. धाराशिव जिल्ह्यात पावसाचा जोर कायम असून परंडा तालुक्यातील शेतक-यांचं मोठं नुकसान झालं आहे. सोयाबीन, मिरची, कापूस यासह असंख्य पिकांचं मुसळधार पावसामुळे मोठं नुकसान झालं आहे. त्यामुळे शासनानं लवकरात लवकर मदत करावी अशी मागणी शेतक-यांकडून करण्यात येत आहे. ▶▶ उर्वरित पान २ वर

### कुठे चाललाय महाराष्ट्र? प्रसिद्ध रयत शिक्षण संस्थेच्या प्रांगणात थिल्लर डान्स



बारामती । प्रतिनिधी

बारामती तालुक्यातील मोरगाव येथील रयत शिक्षण संस्थेला मोठा इतिहास आहे. या संस्थेकडे आदराने पाहिले जाते. पण या आदराला गालबोट लागेल असा एक प्रकार समोर आलाय. रयत शिक्षण संस्थेच्या अंतर्गत येणाऱ्या मयुरेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या आवारात आयोजित एका मनोरंजनात्मक कार्यक्रमाचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. ज्यामुळे लोकांकडून संताप व्यक्त केला जातोय. मे २०२५ मध्ये भैरवनाथ यात्रेनिमित्त ऑर्केस्ट्रा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी नृत्यांगनेचे अश्लील हावभाव असलेले नृत्य या व्हिडिओत दिसत आहे. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी हा व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर करत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. त्यांनी या घटनेचा निषेध करत रयत शिक्षण ▶▶ उर्वरित पान २ वर

### मुंबईत पोलीस वसाहतीत स्लॅब कोसळला, घरातील ३ मुले जखमी ; भिंत कोसळून एकाचा मृत्यू




मुंबई । प्रतिनिधी

राजधानी मुंबईत पहाटेपासूनच मुसळधार पावसाने हजेरी लावल्याने सगळीकडे पाणीच पाणी झाले असून जनजीवन विस्कळीत झाल्याचं दिसून आलं. अनेक ठिकाणी वाहतूक कोंडी झाली तर, काही ठिकाणी जीर्ण इमारतीचा भाग कोसळल्याची दुर्घटनाही घडली आहे. मुंबईतील अंधेरी पश्चिम येथील डी.एन. नगर पोलीस अधिकारी वसाहतीत इमारत क्रमांक ८ मधील रूम नं.१४५ (पहिला मजला) येथे रविवारी पहाटे २ वाजता स्लॅब कोसळल्याची धक्कादायक घटना घडली. या दुर्घटनेत तीन लहान मुले जखमी झाली आहेत. त्यामुळे या पोलीस अधिकारी वसाहतीत राहणाऱ्या कुटुंबांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. इमारतीच्या महिल्या मजल्यावरील स्लॅब मध्यरात्री कोसळल्याने ▶▶ उर्वरित पान २ वर

### अतिवृष्टी, पुरामुळे होणाऱ्या नुकसानीचे पंचनामे तातडीने करण्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांचे निर्देश

मुंबई । प्रतिनिधी

राज्यात सध्या पावसाचा जोर वाढला असून हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार पुढील काही दिवसही पावसाचा जोर कायम राहणार आहे. अतिवृष्टीमुळे निर्माण होणाऱ्या पूर परिस्थितीमुळे राज्यात शेत पीक, फळ बागांचे नुकसान झाल्यास संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी नुकसानीचे पंचनामे तातडीने करून त्याचा अहवाल विनाविलंब सादर करावा, असे निर्देश मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिले आहेत. मदत व पुनर्वसन मंत्री श्री. जाधव-पाटील यांनी सांगितले, भारतीय हवामान विभागाने विदर्भ, मराठवाडा, कोकण या भागात पुढील चार दिवस अतिवृष्टीचा इशारा दिला आहे. प्रशासनाने या भागातील नागरिकांना तातडीने मदत उपलब्ध करून देण्यासाठी सर्तक रहावे. मदत व पुनर्वसन मंत्री जाधव-पाटील यांनी सांगितले की, ▶▶ उर्वरित पान २ वर

# राज्यातील प्रत्येक माणूस सुखी, समाधानी, आनंदी होऊ दे





उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी खेड तालुक्यातील श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिरात ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेऊन विधिवत पूजा केली. राज्यात सर्वत्र चांगला पाऊस पडत आहे, राज्यातील बळीराजा सुखी होऊ दे. चांगले पीक येऊ दे; राज्यातील सर्व जनतेच्या जीवनात सुख, समाधान, आनंदाचे दिवस येऊ दे, अशी प्रार्थना भीमाशंकरचरणी केल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यावेळी म्हणाले. पुजेनंतर उपमुख्यमंत्री शिंदे यांचा भीमाशंकर देवस्थान ट्रस्टच्यावतीने सत्कार करण्यात आला. यावेळी खेडचे उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल मांडवे, तहसीलदार तथा देवस्थानचे कार्यकारी विश्वस्त प्रशांत बेडसे, गटविकास अधिकारी अर्चना कोल्हे, श्री क्षेत्र भीमाशंकर देवस्थानचे अध्यक्ष ड. सुरेश कौदरे, विश्वस्त मधुकर गवांदे, दत्तात्रय कौदरे, रत्नाकर कोडीलकर, सरपंच दत्तात्रय हिले आदी उपस्थित होते. भीमाशंकराचे दर्शन घेतल्यानंतर उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, राज्यातून, देशभरातून लाखो शिवभक्त येथे श्रावणातील सोमवारी दर्शनासाठी येतात. आपणही त्यातील एक शिवभक्त असून दरवर्षीप्रमाणेच श्रावणातील दर्शनासाठी आलो आहे. हे प्राचीन देवस्थान असून दर्शन घेऊन समाधान, आनंद लाभतो. श्री क्षेत्र भीमाशंकर देवस्थान विकास आराखडा २८० कोटी रुपयांचा तयार केलेला असून येथे येण्यासाठीचा रस्ता चांगला करण्यासह येणाऱ्या भाविकांना सोयी सुविधा मिळाव्यात यासाठी आवश्यक ते प्रयत्न करण्यात येतील, असे उपमुख्यमंत्री शिंदे माध्यमांशी संवाद साधताना म्हणाले.

◆ पान १ वरून पुढे...

## वाल्मीक कराडच्या...

असल्याचे नमूद करत आरोपींना कोणताही दिलासा देण्यास कडाडून विरोध केला. त्यामुळे कोर्टाने आपला फैसला ३० ऑगस्टपर्यंत राखून ठेवला. आता या प्रकरणातील आरोपींना जामीन मिळणार की ते तुरुंगातच खितपत राहणार याचा फैसला या महिन्याच्या शेवटी होणार आहे. संतोष देशमुख यांची गतवर्षी ९ डिसेंबर रोजी निघृण हत्या करण्यात आली होती. या प्रकरणी माजी मंत्री धनंजय मुंडे यांचे विश्वासू समजल्या जाणाऱ्या वाल्मीक कराडसह इतर आरोपींना अटक केली होती. या सर्वांनी आता जामिनीसाठी अर्ज दाखल केला आहे. त्यांच्या याचिकेवर विशेष मकोका कोर्टात सलग ३ तास सुनावणी झाली. त्यात वाल्मीक कराडच्या वकिलाने १ तास ४५ मिनिटे युक्तिवाद करत जामिनाची मागणी केली. विशेषतः वाल्मीक कराड याला अटक करताना कोणतेही कारण देण्यात आले नव्हते, अशी बाबही त्यांनी यावेळी कोर्टाच्या निदर्शनास आणून दिली.

त्यावर विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी जोरदार हरकत घेतली. तसेच आवादा कंपनीचे कर्मचारी सुनील शिंदे यांनी रेकॉर्ड केलेल्या फोन कॉलची तारीख चुकीची असल्याचा आरोपींचा युक्तिवादही त्यांनी सीडीआर दाखल करून जोरकसपणे फेटाळून लावला. सीडीआरनुसार वाल्मीक कराडने त्या दिवशी सुनील शिंदे यांना फोन केला होता. त्याची नोंद आहे. या संभाषणाशी संबंधित पुरावे योग्यवेळी कोर्टात सादर केले जातील, असे ते म्हणाले. येत्या ३० ऑगस्टला वाल्मीक कराड यांच्या जामीनवर विशेष न्यायालयाने फैसला राखून ठेवला असल्याने या निर्णयाकडे बीड जिल्ह्यासह राज्याचे लक्ष लागून आहे.

## लिंगी नदीच्या...

राहूल पौळ रा डिग्रस, राहूल नवले रा. पुणेअमर पौळ नावाचा तरुण पाण्याच्या बाहेर सुखरुप काढले असून दुस-या दोन तरुणाला बाहेर काढ्यात यश आले आहे. सदर ठिकाणी राजाभाऊ पौळ व दिग्रसचे सरपंच सुभाष नाटकर व या भागातील प्रमुख कार्यकर्ते,घटनास्थळी उपस्थित आहेत व माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली मदतीचे सहकार्य रात्री बारापासून सुरू आहे आमदार धनंजय मुंडे बचाव कार्यात संपर्क कार्यालय याबाबत सतर्क असून प्रशासनाशी संपर्कात आहेत.

## शासनाने अतिवृष्टीग्रस्त...

अतिवृष्टीची झाल्याची नोंद समोर आली आहे. अतिवृष्टीचा जिल्हाभरातील शेतकऱ्यांना मोठा फटका बसला. शेत पिके, शेतजमीन, तर अनेक ठिकाणी रस्ते व पुलांचे प्रचंड नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांची गंभीर परिस्थिती लक्षात घ्यावी. व तातडीने पंचनामे करून शासनाने मदत जाहीर करावी. तसेच ग्रामीण भागातील रस्ते पुल सुधारणांसाठी विशेष निधीची तरतूद करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केली आहे. संपूर्ण जिल्हाभरात कोसळलेल्या अतिवृष्टी मुळे कापूस सोयाबीन, तूर ,उडीद, मूग, बाजरी या सारख्या उभ्या पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते झाले. असून काही ठिकाणी फळबागांचे ही नुकसान झाले आहे. शेत जमिनी वाहून गेल्या तर काही ठिकाणी जलमय परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकऱ्यांच्या शेतजमिनीचे नुकसान झाले. ग्रामीण भागातील रस्ते व पूलांचे अतोनात नुकसान झाले. रस्ते व पुलांच्या नुकसानी मुळे रहदारीचा प्रश्न निर्माण होणार आहे. यावर्षी खरीपाची जवळपास शंभर टक्के पेरणी झालेली आहे. विम्याचा खर्च जास्त असल्याने अनेक शेतकरी विम्या पासून वंचित आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची संख्या मोठी आहे. शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्यासाठी पंचनामे करून तातडीने नुकसान भरपाई देण्यात यावी.

## बकरवाडी येथे...

लाभला असून, अनेकांनी बाजीराव दादा चव्हाण यांच्या सामाजिक जाणिवेचे कौतुक केले. कार्यक्रमावेळी बाजीराव दादा चव्हाण मित्र परिवारातील सचिन गाडे, गणेश गाडे, लिंबराज गाडे, भिमाशंकर काळे, दिनकर गाडे, गणेश काळे, अशोक गाडे, दत्ता गाडे, ज्योतीराम गाडे, विजय काळे, राम गाडे, विशाल गाडे, दत्ता काळे, दिपक काळे, महादेव गाडे, दशरथ गाडे, गोविंद गाडे, किशोर काळे, दत्ता जाधव, विठ्ठल काळे यांच्यासह गावातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा उपक्रम गावासाठी प्रेरणादायी ठरला असून, अशा सामाजिक कार्यातून युवासेनेचे गावाशी नाते अधिक दृढ होत असल्याचे चित्र या उपक्रमातून दिसून आले.

## पावसाच्या पुराच्या...

मागणी वेळोवेळी करूनही लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने या कामाकडे दुर्लक्ष केले आहे.त्यामुळे प्रत्येक पावसाळ्यात राजापूर करांना हा जीवघेणा प्रवास करावा लागतो. गेवराई तालुक्यातील राजापूर फाटा ते राजापूर गावाला जोडणारा कापसाचा नाला यावर जोरदार पावसामुळे मोठ्या प्रमाणात पाणी आल्याने वाहतूक बंद झाली असून माणसांना जाणे येणे ही करता येत नव्हते सोमवारी सकाळी दहा ते अकरा वाजेपर्यंत पाणी असल्याने संपर्क तुटला होता त्या नंतर पाण्याचा जोर कमी झाल्यावर नागरिकांनी पायी मार्ग काढत पाणी ओलांडले परंतु वाहने वाहतूक बंदच होती,या पाण्यातून नागरिकांना जीवघेणा प्रवास करावा लागत असून विद्यार्थी,वयोवृद्ध यांना त्रास सहन करावा लागत आहे.पावसाळ्यात ही समस्या राजापूर करांना भेडसावत असून या ठिकाणी मोठा पूल करण्याची मागणी वेळोवेळी करण्यात आली होती.मागील दोन तीन वर्षापूर्वी राजापूर येथील सर्वच जनतेने या पुराच्या पाण्यात आंदोलन उभारून पूल करण्याची मागणी केली होती यावेळी लोकप्रतिनिधींनी या आंदोलनाची दखल घेऊन प्रशासनातील अधिकारी यांच्या समवेत भेट देऊन काम करण्याचे आश्वासन देऊन आंदोलन मागे घेण्याची विनंती केल्या नंतर आंदोलन मागे घेण्यात आले होते.परंतु अद्याप ही या ठिकाणचा पूल झाला नसल्याने आता ही राजापूर येथील नागरिकांना पुराच्या पाण्यातून जीवघेणा प्रवास करावा लागत आहे.

## मुलीचा शोध...

द्यावा या मागणीसाठी त्यांनी आंदोलन सुरू केले आहे. पोलीस प्रशासन आतातरी या आंदोलनांची दखल घेऊन या मुलीचा शोध घेणार का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

## बीड शहरातील...

खड्ड्यांनी भरलेले रस्ते, अपुरी ड्रेनेज व्यवस्था आणि रस्त्यांवरील विद्युत खांब यामुळे नागरिकांचे हाल होत आहेत. यासंदर्भात स्थानिक आमदार , स्थानिक सत्तेतले नेते, कार्यकर्ते सह निधी उपलब्ध करून देण्यासाठी पाठपुरावा केल्याचे सांगितले जात आहे. तथापि, शफीक भाऊ यांनी हा दावा फोल ठरवत, क्षीरसागर बंधूंनी आणि स्थानिक नेते सह फक्त आतापर्यंत केवळ श्रेय घेण्यासाठी आटापीटा केला, प्रत्यक्षात कामात अडथळे आणण्याचाच त्यांचा उद्योग आहे, आणि टक्केवारीसाठी आणि कार्यकर्ते पोसण्यासाठी हे हे जनतेची दिशाभूल करतात असा घणाघाती आरोप केला आहे.

१०० कोटींच्या निधीवर प्रश्नचिन्ह- उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बीडच्या विकासासाठी १०० कोटींचा निधी जाहीर केला आहे. यामध्ये रस्ते, नाले आणि शहर सुशोभीकरणासाठी १० कोटींचा समावेश आहे, असे सांगितले जाते. मात्र, या निधीचा वापर खरोखरच शहराच्या विकासासाठी होणार की, निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय लाभासाठी, याबाबत शफीक भाऊ यांनी शंका उपस्थित केली आहे. नगर परिषदेत आतापर्यंत सत्ता भोगली, पण विकास झाला नाही. आता हा निधी स्वतःच्या फायद्यासाठी वापरला जाणार तर नाही ना? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे.

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर टीका तीव्र- येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बीडमधील राजकीय वातावरण तापले आहे. क्षीरसागर बंधूंवर श्रेय घेण्याचा आणि विकासकामात अडथळे आणल्याचा आरोप करत, शफीक भाऊ यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, बीडकरांनी या नेत्यांना आता निवडणुकीत जागा दाखवावी आणि खऱ्या अर्थाने विकासाला चालना द्यावी.

स्थानिकांचा उद्रेक आणि अपेक्षा- बीड शहरातील रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे स्थानिक नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी आहे. रस्त्यांसाठी निधी मंजूर होतो, पण कामे का होत नाहीत? नेते फक्त घोषणा करतात, प्रत्यक्षात काहीच बदल दिसत नाही, अशी भावना अनेक नागरिकांनी व्यक्त केली आहे. यापूर्वीही बीड शहरातील रस्त्यांसाठी ७० कोटी आणि जिल्ह्यातील रस्त्यांसाठी २५१ कोटींचा निधी मंजूर झाला होता, पण त्याचा प्रत्यक्ष परिणाम दिसून आलेला नाही, अशी टीका होत आहे.

## 25 ऑगस्टला...

कामगारांच्या प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे आहेत - वाळूचा टेंडर काढून वाळू खुली करण्यात यावी. कामगारांना ९० दिवसांच्या कामाचे प्रमाणपत्र ग्रामसेवकांकडून तात्काळ देण्यात यावे. नोंदणी व नूतनीकरणाशी संबंधित प्रलंबित कामे निकाली काढावीत. लाभांसाठी भरलेले अर्ज प्रलंबित न ठेवता त्वरित मंजूर करावेत. किरकोळ तुरट्या (queries) काढणे थांबवावे. करेक्शनची प्रक्रिया लवकर पूर्ण करावी अथवा करेक्शन लिंक सुरु करावी. अनोंदणीकृत कामगारांचा मृत्यू झाल्यास त्यांच्या वारसांना F01, F05 d FD6 चे लाभ द्यावेत. ऑफलाईन पद्धतीत मृत्यू झालेल्या कामगारांच्या वारसांना लाभ देण्याची प्रक्रिया शासनाने त्वरित सुरु करावी. या मागण्यांकडे शासनाने दुर्लक्ष केल्यास कामगारांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

निवेदनावर शेख मुख्तार शेख सत्तार, मा. अलीम पटेल, मोडनौद्दिद्दीन फारुक मोमीन, सय्यद नजीर सय्यद वजीर, संजू गायकवाड, चंद्रकांत काळे, शेख जमील शेख निजाम, शेख चांद शेख मोहम्मद, रहिम पठाण, रायचंद परदेशी, अमजद शेख, बंडू दळवी, सय्यद अजमत अली उस्मान अली, शेख मोइनुद्दीन शेख गनी, मारुती शिंदे, अब्रार अहेमद कागजी, एजाज शेख, इफरोज शेख, बेग कालू बेग जाफर, शेख तस्लीम, जाकेर पठाण यांच्यासह अनेक पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## मराठवाड्यात १ ...

यवतमाळच्या आर्णी तालुक्यात पैनगंगा नदी कोपली आहे. हजारो हेक्टर शेती मुसळधार पावसामुळे पाण्याखाली गेलीय. मुकिंदपूर अंबोडा रस्ता तीन दिवसांपासून पाण्याखाली गेलाय. त्यामुळे कवठा बाजार, दोनवाडा, कोसदनी, साकुर इथले शेकडो शेतक-यांच्या शेतात पाणीच पाणी झालं आहे. पैनगंगेच्या पुरामुळे हा रस्ता बंद होतो त्यामुळे पुलाची मागणी, शेतकरी करत आहेत. अकोला जिल्ह्यातील पातुर तालुक्यात मोर्णा नदीच्या पाणी पातळीत वाढ झाल्याने दुधानी धबधबा ओसंडून वाहत आहे. सततच्या पावसामुळे धबधब्याचा वेग वाढला असून परिसरात पाण्याचा जोर अधिक जाणवत आहे. धबधब्याच्या आसपास असलेल्या कोठारी बू, कोठारी खुर्द, पार्डी, आगीखेड आणि खामखेड गावांच्या नदीकाठावरील शेतजमिनीतील पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. मराठवाड्यातील १ लाख १९ हजार ९६४ शेतकरी पावसामुळे बाधित झालं आहे, तसंच १ लाख ११ हजार ४२०.५५ हेक्टर वरील शेतीचं मोठं नुकसान झालं आहे. दरम्यान लवकरच शेतीचे पंचनामे करण्यात येणार असल्याचं शासनाकडून सांगण्यात आलं आहे. मे महिन्याच्या अखेरीस राज्यभर मुसळधार पाऊस झाल्याचं पाहायला मिळालं होतं. दरम्यान त्यानंतर जून आणि जुलैमध्ये हवा तसा पाऊस न झाल्यामुळे शेतकरी चिंतेत होता. मात्र, मागील दोन दिवसांपासून झालेल्या अतिवृष्टीमुळे बळीराजा संकटात सापडला असून त्याचं मोठं नुकसान झालंय.. त्यामुळे नुकसानग्रस्त शेतीचे लवकरात लवकर पंचनामे करून मदतीची मागणी शेतक-यांकडून करण्यात येत आहे.

## कुठे चाललाय...

संस्थेच्या प्रतिष्ठेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. हा व्हिडिओ शैक्षणिक संस्थेच्या पवित्रतेला धक्का लावणारा असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. रयत शिक्षण संस्थेची पार्श्वभूमी काय?- रयत शिक्षण संस्था ही महाराष्ट्रातील एक नावाजलेली शैक्षणिक संस्था आहे, जी राज्यभरात अनेक शाळा आणि महाविद्यालये चालवते. मोरगाव येथील मयुरेश्वर विद्यालयही याच संस्थेच्या अंतर्गत आहे. या शाळेच्या प्रांगणात दरवर्षी भैरवनाथ यात्रेनिमित्त मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित केले जातात, कारण गावात स्वतंत्र मैदान उपलब्ध नाही. स्थानिकांच्या मते, ही वर्षानुवर्षे चालत आलेली परंपरा आहे. मात्र, यंदाच्या कार्यक्रमातील नृत्याच्या अश्लील स्वरूपामुळे ही परंपरा वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे.

## मुंबईत पोलीस...

कुटुंबातील ३ मुले जखमी झाली होती. त्यांच्या डोक्यातून रक्तश्राव देखील होत होता. आता, या कोसळलेल्या घरातील पोलीस अधिकाऱ्यांनी ही रूम खाली करून भाड्याच्या घरात जाणे पसंत केले आहे. या घटनेतील गंभीर बाब म्हणजे, यापूर्वी देखील या वसाहतीत स्लॅब कोसळण्याच्या अनेक घटना घडल्या असून अधिकारी वर्गाने वेळोवेळी सार्वजनिक बांधकाम खात्याकडे तक्रार केली होती. तरीसुद्धा संबंधित विभागाने दुरुस्ती व देखभाल कार्याकडे सतत दुर्लक्ष केल्यामुळे पुन्हा एकदा जीवितास धोका निर्माण झाला आहे. येथील नागरिक व पोलीस कर्मचारी वर्ग यांच्यात तीव्र नाराजी असून, सार्वजनिक बांधकाम खात्याच्या ढिलाईमुळे घडणाऱ्या या अपघातासाठी जबाबदार अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी होत आहे. जर, पोलीस विभागातील अधिकाऱ्यांची ही गत असेल तर सर्वसामान्य नागरिकांचं काय, असा सवालही यानिमित्ताने उपस्थित होत आहे.

## अतिवृष्टी, पुरामुळे...

शासन नागरिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या घटकांना त्वरित मदत व दिलासा मिळावा यासाठी प्रशासनाने अतिवृष्टी, पुरामुळे बाधितांचे तातडीने पंचनामे करावेत. या नुकसानीचा अहवाल संबधित विभागीय आयुक्तांमार्फत शासनास सादर करावा, असेही मदत व पुनर्वसन मंत्री श्री. जाधव-पाटील यांनी सांगितले.

◆ पान ४ वरून पुढे...

## खाकी वर्दीतल्या...

माणुसकीला आपला सलाम असल्याचे धनंजय मुंडे यांनी आपल्या एक्स पोस्ट मध्ये म्हटले आहे. या ऑपरेशन मध्ये उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, तहसीलदार व्यंकटेश मुंडे, या भागातील पदाधिकारी राजाभाऊ पौळ, सुभाष नाटकर, यांच्यासह अजय मुंडे तसेच धनंजय मुंडे यांच्या कार्यालयीन यंत्रणेने रात्रभर जागून बचाव कार्यात मदत केली.

## बीड जिल्हा ...

सत्कार केला. यानंतर माननीय अँड .उज्वल निकम साहेबांनी आपले मनोगत व मार्गदर्शन केले त्यांनी मनोगतामध्ये सर्व नवोदित विज्ञानासाठी मी चांगलं व्यासपीठ तयार करून देणार. तसेच विधीजनाकडे येणारे पक्षकार यांच्याशी विरीज्ञाने प्रामाणिकपणे बोलावे जे खरे आहे ते सांगावे . त्यांचे मार्गदर्शन हे सर्व वकील बंधूंसाठी फार प्रेरणादायी ठरले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अँड .मनीषा कुपकर गडकर मॅडमनी केले आज आपण सगळ्यांनी अशा एका व्यक्तिमत्त्वाचा गौरव केला आहे की ज्यांनी न्यायव्यवस्थेत कार्य करून देशाला विश्वास दिला आणि आता राज्यसभेत खासदार म्हणून सेवा करण्याची त्यांना संधी मिळाली आहे त्यांचा गौरव हा सर्व वकिलांचा गौरव आहे त्यांची ही यशस्वी वाटचाल देशाच्या लोकशाहीला नवी दिशा देईल याचा आपणास विश्वास आहे असे सूत्रसंचालन अँड.मनीषा गडकर कुपकर महिला प्रतिनिधी यांनी केले. शेवटी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन बीड जिल्हा वकील संघाचे कोषाध्यक्ष माननीय अँड .योगेश जी टेकाडे सर यांनी केले. या कार्यक्रमासाठी बीड जिल्हा वकील संघातील विधीज्ञ व महिलांनी विधीज्ञ मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## शैक्षणिक नुकसान....

पालक व ग्रामस्थांची तातडीची बैठक झाली. या बैठकीत ग्रामपंचायत व शालेय व्यवस्थापन समितीने ठराव मंजूर केला असून, त्यासह पालकांच्या स्वाक्षरीचे पत्र जिल्हा प्रशासन व लोकप्रतिनिधींना पाठवण्यात आले आहे. या बैठकीस शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुधीर वाणी, पत्रकार हरिओम क्षीरसागर, लेनाजी गायकवाड, अँड. गणेश वाणी, विक्रांत वाणी, दिनेश जाधव, संतोष भोसले, अशोक वाणी, रामदास मुळे, अभिजित गायकवाड, चेतन कानिटकर, तुकाराम गायकवाड, अशोक थोरात, मंगेश जाधव, आनंद बारगजे, संदिप मुळे आदी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. गुणवत्ता वाढवणारे शिक्षक गमावण्याचा धोका- लिंबागणेश शाळेत इयत्ता १ ते ४ पर्यंत सुमारे १२५ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मुख्याध्यापक आबासाहेब हांगे व शिक्षक अमर पुरी, संदिपान आगाम, भरत चौरे, माधुरी कुलकर्णी यांच्या प्रयत्नांमुळे या शाळेची गुणवत्ता लक्षणीयरीत्या वाढली आहे. इतकेच नव्हे तर गावातील इंग्लिश स्कूलमध्ये शिकणारी मुलेही पुन्हा जिल्हा परिषद शाळेत दाखल झाली आहेत. तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी अजित पवार आणि शिक्षणाधिकारी प्राथमिक कुलकर्णी यांनी प्रत्यक्ष शाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचे कौतुक केले होते. अशा परिस्थितीत या शिक्षकांची बदली म्हणजे मुलांच्या भवितव्याशी खेळ असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. आंदोलनाची हाक- शिक्षकांच्या बदल्या रद्द न झाल्यास लिंबागणेशकर रस्त्यावर उतरून आंदोलन छेडण्यास भाग पाडले जाईल, असा इशारा पालक व ग्रामस्थांनी दिला आहे.

## बार्शीनाका रेल्वे...

पालवन रेल्वे स्टेशनवरून नगरला जाण्यासाठी पन्नास रुपये लागणार आहेत तर बीड शहरातून पालवण स्टेशनवर जाणेसाठी शंभर ते दीडशे रुपये खर्च होणार आहेत म्हणून पालवन रेल्वे स्टेशन नागरिकांना परवडणारे नाहीत म्हणून बार्शीनाका इमामपुर रोडवर रेल्वे स्टेशन थांबा चे काम त्वरित सुरू करावे कारण बार्शी नाक्यावरून शेतकऱ्यांना आणि सर्वच नागरिकांना नवा आणि जुना मोंढा. कृषी उत्पन्न बाजार समिती. एमआयडीसी. आठवडी बाजार. आडत मार्केट. बस स्टॅन्ड. जिल्हाधिकारी कार्यालय. तहसील कार्यालय. समाज कल्याण ऑफिस. जिल्हा रुग्णालय. एसपी ऑफिस. जिल्हा न्यायालय. शासकीय दूध डेरी. महिला रोगणालय. जिल्हा क्रीडांगण आणी जवळपास ९५ टक्के शाळा महाविद्यालय हे बार्शीनाका इमामपुररोड रेल्वे स्टेशनवरून जवळ आहेत तसेच चारो दिशेने नॅशनल हायवे असल्यामुळे बार्शी रेल्वे स्टेशन वर ट्राफिक होणार नाही विशेष म्हणजे बार्शीनाका इमामपुर रेल्वे स्टेशनवर रेल्वेत बोर्डाने यापूर्वीच जमीनी खरेदी करून चार मोठ्या बिल्डिंग तैय्यार केलेले आहेत म्हणूनच एकदम कमी खर्चयात कम खर्चात रेल्वे स्टेशन होईल म्हणून बार्शी नाका इमामपुर रोडवर रेल्वे स्टेशन (रेल्वे थांबा)चे काम त्वरित सुरू करावे अशी नम्र विनंती बार्शी नाका इमामपुर रोड रेल्वे स्टेशन कृती समितीच्या वतीने उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे करण्यात आली असता उपमुख्यमंत्री दादांनी सदर निवेदन लक्षपूर्वक वाचले आहे, यावेळी संपादक गम्मतभाऊ भंडारी यांचे मार्गदर्शन लाभले असुन बार्शीनाका रेल्वे स्टेशन कृती समितीचे कार्य अध्यक्ष खुर्शीद आलम यांच्या नेतृत्वात, गोरख शिंगण,नगरसेवक अमोल पऊड, शेख अखील भाई, शनेश्वर गायकवाड,शेख युनुस भाई, आदी मान्यवर उपस्थित होते,

## परळीतील धोकादायक....

स्थानबद्ध करण्याचे आदेश दिले. शुभम जाधवविरुद्ध परळी शहर व सोनपेठ पोलीस ठाण्यात खुनाचा प्रयत्न, अपहरण, गंभीर दुखापत, अवैध शस्त्र बाळगणे, धमक्या देणे असे गंभीर गुन्हे नोंद आहेत. त्याच्या विरोधात एकूण १४ गुन्ह्यांपैकी १२ न्यायप्रविष्ट असून २ तपासाधीन आहेत. यापूर्वीही त्याच्यावर प्रतिबंधक कारवाई झाली होती; मात्र तो दहशतीचे वातावरण निर्माण करून पुन्हा गुन्हेगारीकडे वळला. त्याच्या भीतीपोटी नागरिक तक्रार किंवा साक्ष देण्यास पुढे येत नव्हते.

१८ ऑगस्ट रोजी दुपारी ३.५२ वाजता परळी शहरातून त्याला अटक करून योग्य पोलीस बंदोबस्तात हर्सूल कारागृहात रवानगी करण्यात आली. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कांवत यांच्या मार्गदर्शनाखाली अपोअ चेतना तिडके, उपविपोअ ऋषीकेश शिंदे, पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, रघुनाथ नाचण, तसेच परळी शहर पोलीस ठाण्याच्या पथकाने केली. भविष्यात जिल्ह्यात खंडणीखोर, दादागिरी करणारे, मटका-जुगार चालक तसेच जीवनावश्यक वस्तूंचा काळाबाजार करणाऱ्यांवर चझऊ कायद्याअंतर्गत कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा पोलीस अधीक्षक नवनीत कांवत यांनी दिला आहे.

## श्री योगेश्वरी देवल....

उपस्थित होते. अंबाजोगाई तालुक्याची व्याप्ती ही मोठ्या प्रमाणावर असल्याने येथील तहसील कार्यालयात दररोज हजारो नागरिक येथे आपल्या शासकीय कामासाठी येतात . खेड्यापाड्यातुन येणाऱ्या नागरिकांना त्यांच्या कामासाठी अनेक वेळा दिवस दिवस थांबावे लागते. त्यांना यावेळी पाणी पिण्यासाठी वणवण फिरावे लागत होते. येथील सामाजिक भान ठेवून काम करणारे तहसीलदार विलास तरंगे यांच्या कानावर ही बाब येताच त्यांनी तात्काळ पाण्याच्या जारची व्यवस्था केली. मात्र आणलेल्या जारनेही पाणी पिण्याची समस्या सुटत नसल्याचे दिसून येताच त्यांनी श्री योगेश्वरी देवल कमिटीचे पदसिद्ध अध्यक्ष असल्यामुळे सर्व विश्वस्त मंडळाच्या बैठकीत ही बाब मांडली. तहसील कार्यालयात ग्रामीण भागातून येणाऱ्या नागरिकांची पाण्यावाचून होत असलेली फरफट लक्षात घेऊन सर्व संचालक मंडळाने अंबाजोगाई तहसील कार्यालयात पिण्याचे पाणी थंड व शुद्ध करणारी कायमस्वरूपी जलशुद्धीकरण यंत्रणा ( वॉटर प्युरीफायर) बसविण्याचा ठराव संमत केला.

त्यानुसार दि१५ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून अंबाजोगाई तहसील कार्यालयात बसविण्यात आलेल्या दीड लाख रुपये किमतीचे व ३०० लिटर क्षमतेच्या जलशुद्धीकरण यंत्राचे लोकार्पण सर्व विश्वस्त मंडळाच्या उपस्थितीमध्ये करण्यात आले. या जलशुद्धीकरण यंत्रामुळे तहसील कार्यालयात येणाऱ्या सर्व अभ्यंगतांची पिण्याच्या थंड व शुद्ध पाण्याची सोय होणार आहे. विविध शासकीय योजनेसाठी तहसील कार्यालयात येणारे विद्यार्थी, जेष्ठ नागरिक, महिला तसेच तहसील कार्यालयातील कर्मचारी बांधवांच्या पिण्याच्या पाण्याची कायमस्वरूपी सोय करून दिल्याबद्दल तहसीलदार विलास तरंगे यांनी श्री योगेश्वरी देवल कमिटीच्या सर्व विश्वस्तांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करून त्या सर्वांचे त्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले. यावेळी तहसीलदारांनी तहसील कार्यालयात केलेले आधुनिकीकरण व ग्रंथालय पाहून तहसीलदार विलास तरंगे यांचे देवल कमिटीच्या विश्वस्त मंडळाचे कौतुक करत त्यांच्या हातून अशीच लोकसेवा घडून कार्यालयात येणाऱ्या नागरिकांच्या समस्यांचे निराकरण होवो अशा शुभेच्छा दिल्या.

## एस.टी. ....

बाळासाहेब आंबेडकर यांच्याकडे तक्रार नोंदवली आहे. सरवदे यांची ठाम मागणी निलेश पवार यांचा अनधिकृत चार्ज तात्काळ काढून घेण्यात यावा, त्यांच्या कार्यकाळातील सर्व कामकाज व बदली प्रकरणांची स्वतंत्र चौकशी समितीकडून तपासणी करण्यात यावी, दोषींवर आवश्यक ती प्रशासकीय व शिस्तभंगात्मक कारवाई करण्यात यावी. शासन व प्रशासनावर दबाव सरवदे यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, जर शासनाने तातडीने कारवाई केली नाही तर वंचित बहुजन आघाडी उग्र आंदोलन उभारेल आणि बीड जिल्ह्यातील एस.टी. प्रशासनाला जबाबदार धरले जाईल.

## गुत्तेदारीसाठी राजकारण...

स्वार्थासाठी राजकारणात आलेले भ्रष्ट अधिकाऱ्याची पाठराखण करून मलिदा लाटणारे निवडणुका डोळ्यासमोर ठेवून स्वार्थ साधणारे काही पक्षाचे जिल्हा पदाधिकारी यांनी बीड शहरातील सुजाण नागरिकांची दिशाभूल करू नये असे आव्हान भिम स्वराज्य सेनेचे संस्थापक/ अध्यक्ष तथा नगरसेवक ॲड विकास जोगदंड यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकातून केले आहे. तसेच घोडा मैदान जवळ असून आगामी नगरपरिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ योगेश क्षीरसागर यांच्या पाठीशी सर्व सामान्य नागरिक उभा असून विकासात्मक नेतृत्वालाच प्राधान्य देईल असा विश्वास ही शेवटी माजी नगरसेवक ॲड विकास जोगदंड यांनी पत्रकातून व्यक्त केला आहे

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# रानभाज्याचे माणसाच्या आहारात अनन्य साधारण महत्व: आ प्रकाशदादा सोळंके




## कृषी कार्यालयाच्या राणभाजी महोत्सवास शेतकऱ्यांचा उत्स्फूर्तपणे प्रतिसाद

**माजलगाव । प्रतिनिधी**

रानभाज्याची आपल्या आहारात समावेश केल्यामुळे आपले आरोग्य अबाधित राखले जाते असे प्रतिपादन आमदार प्रकाशदादा सोळंके यांनी पंचायत समिती माजलगाव येथे तालुका कृषी अधिकारी कार्यालय माजलगाव यांनी काल दि १८ ऑगस्ट २०२५ रोजी आयोजित केलेल्या रानभाजी महोत्सव मध्ये केले. रानभाजी महोत्सव चा उद्घाटन आमदारश्री प्रकाशदादा सोळंके यांच्या हस्ते करण्यात आले. पुढे बोलताना रानभाज्या नैसर्गिकरित्या आपल्या शेतशिवारामध्ये उपलब्ध होत असून त्यावर कसल्याही प्रकारच्या कीटकनाशकांचा वापर केला जात नाही तसेच या रानभाज्यामध्ये विविध प्रकारचे विटामिन्स.खनिजे, प्रथीने असल्यामुळे आपल्या आरोग्यास लाभदायक असतात या रानबाजासाठी ग्राहक आणि उत्पादक साठी सुविधा उपलब्ध करून दिल्यास अनेकांना फायदा होईल असे सांगितले.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक श्री गणेश बादाडे तालुका कृषी अधिकारी माजलगाव यांनी करताना विविध भाज्यांचे महत्त्व आणि त्यांच्या रेसिपी याविषयी माहिती सांगितली. श्रीमती श्रद्धा भवारी उपविभागीय कृषी अधिकारी माजलगाव यांनी आपल्या मनोगत व्यक्त करताना रानभाज्या आणलेल्या शेतकरी,शेतकरी गट,महिला बचत गटांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून प्रशासक तथा गट विकास अधिकारी माजलगाव श्रीमती ज्योत्स्ना मुळीक आणि पंचायत समितीचे माजी उपसभापती मनसबदार, उपस्थित होते यावेळी श्री जागृत खेडकर मंडळ कृषी अधिकारी माजलगाव,दत्तप्रसाद भोसले मंडळ कृषी अधिकारी गंगामसला,गोपीनाथ पवार तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक माजलगाव अण्णासाहेब जगताप पुरस्कार प्राप्त शेतकरी तसेच कृषी विभागातील सर्व उप कृषी अधिकारी,सहाय्यक कृषी अधिकारी,आत्मा कर्मचारी आणि तालुक्यातील मोठ्या प्रमाणावर शेतकरी, पत्रकार उपस्थित होते यावेळी रानभाजी स्टॉल लावलेल्या शेतकऱ्यांमधून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक काढून त्यांचे प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आले.

## श्रावण सोमवार निमित्त फार्मसी महाविद्यालयाच्या वतीने खोलेश्वर महादेव मंदिरात भाविकांना फराळाचे वाटप

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

हिंदू धर्मात श्रावण महिन्याला अतिशय महत्वाचे स्थान आहे. श्रावण महिना हा अतिशय पवित्र मानला जातो. या महिन्यात अनेक मंदिरात किंवा अन्य ठिकाणी महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते. आज श्रावण महिन्यातील शेवटचा सोमवार असल्याने श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचालित बी. फार्मसी महाविद्यालय, अंबाजोगाई येथील राष्ट्रीय सेवा योजना (छडड) विभागाच्या पुढाकाराने, अंबाजोगाई येथील



प्राचीन श्री खोलेश्वर महादेव मंदिरात श्रावण महिन्यातील पवित्र श्रावण सोमवारी भक्तिभावाने फराळ वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष तरके यांच्या हस्ते संपन्न झाले. उद्घाटनप्रसंगी त्यांनी श्रद्धेच्या माध्यमातून सेवा आणि समाजाशी जोडलेली नाळ विद्यार्थ्यांमध्ये बळकट करणे हाच खरा उद्देश असल्याची भावना व्यक्त केली..सकाळपासूनच मंदिरात भाविकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी झाली होती. दर्शन करून परत जाणाऱ्या भाविकांना साबुदाणा खिचडी आणि फळे यांचा समावेश असलेल्या उपवास फराळाचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमात बी. फार्मसी महाविद्यालयाच्या छडड विभागातील स्वयंसेवकांनी अत्यंत शिस्तबद्ध आणि सेवाभावी योगदान दिले. त्यांनी गर्दी नियंत्रण, फराळ वितरण, स्वच्छता व्यवस्थापन आणि विशेष गरजा असलेल्या भाविकांना मदत अशा विविध सेवा दिल्या.

## जोधाप्रसादजी मोदी विद्यालयाच्या विद्यार्थ्याचा अंबाजोगाई स्वा रा ती वैद्यकीय महाविद्यालयात एमबीबीएस साठी प्रवेश

### संस्थेचे संस्थापक राजकिशोर मोदी यांच्याकडून शेख सद्दाम व त्याच्या कुटुंबाचा सन्मान

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे जोधाप्रसादजी मोदी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा विद्यार्थी शेख सद्दाम अलीम याने सन २०२५ च्या छएएढ परीक्षेत ५०८ गुण मिळवून अंबाजोगाई येथीलच स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयात एमबीबीएस साठी प्रवेश मिळवला आहे. शेख सद्दाम याच्या यशाबद्दल श्री



बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक राजकिशोर मोदी यांच्या वतीने सद्दाम व त्याच्या कुटुंबाचा यथोचित सन्मान व सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सद्दाम व त्याची आई , जोधाप्रसादजी मोदी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य विनायक मुंजे, सामाजिक कार्यकर्ते सय्यद ताहेर तसेच श्री योगेश्वरी पतसंस्थेचे संचालक जावेद गवळी हे उपस्थित होते.शेख सद्दाम अलीम याचे ११ वि १२ चे शिक्षण हे जोधाप्रसादजी मोदी महाविद्यालयातच झाले आहे. अत्यंत बिकट परिस्थिती व आर्थिक संकटाचा सामना करत सद्दाम याने आपले शिक्षण केले आहे.

## मुख्याधिकारी यांच्याकडून मनसेच्या आंदोलनाची दखल; आंदोलकांना दिले लेखी हमीपत्र



**बीड । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज चौक ते राजुरी वेस, कारंजा रोड,बलभीम चौक, जुना बाजार ते कोतवाली वेस पर्यंतच्या रस्त्याचा काम तात्काळ सुरू करण्यात यावा या मागणीसाठी आज महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्यावतीने नगरपरिषद कार्यालय बीड येथे बेमुदत धरणे आंदोलन होते तरी मा. मुख्याधिकारी शैलेश फडसे यांनी लिखित स्वरूपात लवकरच रस्त्याचा काम सुरू करण्यात येईल असे आश्वासन दिले असता आंदोलन स्थगित करण्यात आले. यावेळी उपमुख्य अधिकारी सम्राट कदम यांच्याकडून पत्र स्वीकारताना मनसेचे वर्षा जगदाळे (महिला राज्य उपाध्यक्ष), आशा कुटे (महिला बीड जिल्हाध्यक्ष), सदाशिव बिडवे (जि. उपाध्यक्ष), आकाश सुरवसे, (सहकार सेना जिल्हाध्यक्ष), कल्पना कवठेकर (महिला जि.उपाध्यक्ष), सुनिता सोनवणे, पठाण अमर जान (बीड शहराध्यक्ष), स्वराज मस्के (तालुका उपाध्यक्ष)

## द्वारकाधीश मित्र मंडळा वतीने श्रीमंत बाजीराव पेशवे जयंती साजरी

**बीड । प्रतिनिधी**

येथील धोंडीपुरा भागात अजिंक्य योद्धा श्रीमंत बाजीराव पेशवे यांची जयंती साजरी करण्यात आली. धोंडीपुरा भागात द्वारकाधीश भावना समोर सोमवारी रात्री अजिंक्य योद्धा श्रीमंत बाजीराव पेशवे यांना जयंती निमित्त अभिवादन करण्यात आले.

नगरसेवक जगदीश गुरखुदे आणि लोकप्रश्न ची संपादक दिलीप खिस्ती यांच्या हस्ते श्रीमंत बाजीराव पेशवे यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. अवघ्या चाळीस वर्षाच्या



आयुष्यात बाजीराव पेशवे यांनी ४१ लढाया जिंकल्या एकही युद्ध ते पराजित झाले नाहीत. म्हणून त्यांना अजिंक्य योद्धा म्हणतात. अशा पराक्रमी योध्याचा आदर्श सर्वांनी घ्यावा असे आवाहन उपस्थित मान्यवरांनी केले .यावेळी डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, पत्रकार लक्ष्मीकांत रुईकर, परशुराम गुरखुदे, विजेंद्र चौधरी सर, विनायक वझे सर,गजानन जोशी, बाळासाहेब थिगळे, संग्राम पाटील, जिवा वाघमारे, संदीप बोंडगे, संजय गुळजकर,नजीर शेख, सागर देशपांडे व द्वारकाधीश मित्र मंडळ

## दिंद्रुड येथे दहीहंडीचा रोमहर्षक सोहळा थरार पाहण्यासाठी बाजारतळावर गर्दी

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड हे गाव सांस्कृतिक व धार्मिक कार्यात नेहमीच अग्रेसर असते. मागील पंचवीस वर्षांपासून श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या निमित्ताने येथील सर्व जाती धर्मातील युवकांच्या पुढाकाराने दहीहंडी बांधण्यात येते.शिवभक्त गणेश मंडळ,एकता गणेश मंडळ व अक्षय चांदबोधले मित्र मंडळाच्या साठ गोविंदांनी यावर्षीही बोल बजरंग बली की जय, गोविंदा आला रे आला आदी गाण्यांच्या तालावर मोठ्या उत्साहाने दहीहंडीच्या उत्सवात सहभागी झाली होती. गुलालाची उधळण करत बाळ गोपाळ सुद्धा या उत्सवात आनंदाने सामील झाले होते. माजी सरपंच अजय कोमटवार, पत्रकार संतोष स्वामी, अमोल ठोंबरे, गणेश काटकर यांच्या हस्ते श्रीकृष्ण प्रतिमेचे पूजन करून व श्रीफळ वाढवून दहीहंडीच्या उत्सवास प्रारंभ करण्यात आला. बळीराजाला सुगीचे दिवस यावेत, गावात शांतता नांदावी यासाठी उपस्थितांनी भगवान श्रीकृष्णाकडे प्रार्थना केली.



## गेवराई येथे सुरु असलेल्या गायरान धारकांच्या साखळी उपोषणाला महात्मा फुले समता परिषदेचा पाठिंबा

**गेवराई । प्रतिनिधी**

येथील दलित महिला व दलित समाज बांधव हे गेल्या ४० ते ४५ वर्षापासून गायरान शेतजमीन कसत असून त्यांच्या एकीला नोंदी आहेत. परंतु अद्यापपर्यंत त्यांची सातबारा उताऱ्यावर मालकी हक्कात नोंद झालेली नाही. हि गायरान शेतजमीन नावावर करावी यासाठी अतिक्रमण धारकांनी गेल्या दहा दिवसांपासून गेवराईत साखळी उपोषण सुरू केले आहे. त्यांची मागणी रास्त असताना शासन व प्रशासन याकडे दुर्लक्ष करत आहे. भूमीहीन गायरान एकता आंदोलनाच्या वतीने गायरान धारकांचे गेवराईत साखळी उपोषण सुरू आहे. यामध्ये वयोवृद्ध महिलांचा मोठया प्रमाणात सहभाग आहे. साखळी उपोषणाला दहा दिवस झाले असताना प्रशासन याकडे दुर्लक्ष करत आहे. गायरान शेतजमीन त्यांच्या नावे करावी हि आंदोलन धारकांची प्रमुख मागणी आहे. परंतु झोपेचं सोंग घेतलेले अधिकारी याकडे लक्ष द्यायला तयार नाहीत. लोकप्रतिनिधींनी देखील याकडे दुर्लक्ष केले आहे. जोपर्यंत न्याय मिळत नाही तोपर्यंत हे साखळी उपोषण सुरूच राहणार असा आक्रमक पवित्रा गायरानधारक वयोवृद्ध महिलांनी घेतला आहे. या आंदोलनस्थळी रविवारी महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे सिनेट सदस्य - अॅड.सुभाष भाऊ राऊत यांनी भेट देऊन या आंदोलनास पाठिंबा दिला आहे. आंदोलकांना न्याय मिळवून देण्यासाठी महात्मा फुले समता परिषद संपूर्ण ताकदीनिशी आंदोलकांच्या पाठीशी आहे असा विश्वास ड.सुभाष भाऊ राऊत यांनी दिला आहे.

## डॉ.ओमप्रकाश शेटे यांची 'पुस्तक तुला' देवदूत प्रतिष्ठान चा प्रेरणादायी उपक्रम..!

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

आयुष्मान भारत-मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांचा वाढदिवस विविध सामाजिक, शैक्षणिक व लोकोपयोगी उपक्रमांनी साजरा करण्यात आला. डॉ.शेटे यांच्या हार-तुरे नको, पुस्तके द्या या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी त्यांची पुस्तक तुला करण्यात आली. यांच्या वजनाऐवढे



पुस्तके वाचनालयास भेट स्वरूपात देण्यात आले. विशेष म्हणजे तब्बल पंधरा तास उभा राहून डॉ. शेटे यांनी स्नेहीजनांच्या शुभेच्छा स्वीकारल्या.देवदूत प्रतिष्ठानच्या वतीने विधवा महिलेस शिलाई मशीन देऊन स्वावलंबनाचा संदेश दिला गेला. डॉ.ओमप्रकाश शेटे यांच्या वाढदिवसानिमित्त देवदूत प्रतिष्ठानच्या वतीने त्यांची ग्रंथ-तुला करण्यात आली. या प्रेरणादायी उपक्रमाने एक नवा आदर्श घडवला. आरोग्यदूत डॉ. शेटे यांनी वाढदिवसानिमित्ताने बुके ऐवजी पुस्तके भेट देण्याचे आवाहन केले होते.

## राजमाता इंग्लिश स्कूलमध्ये दहीहंडी उत्सव उत्साहात साजरा

**बीड । प्रतिनिधी**



बीड शहरातील राजमाता इंग्लिश स्कूलमध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त दहीहंडी उत्सव मोठ्या जल्लोषात व उत्साहात साजरा करण्यात आला शाळेतील विद्यार्थी- विद्यार्थ्यांनी पारंपारिक पोशाखात सहभागी होत या उत्सवाला विशेष रंगत आणली. विद्यार्थी-विद्यार्थिनीच्या गटाने हंडी फोडण्यासाठी मनोरे रचले. गोविंदा आला रे! या घोषणांनी संपूर्ण शाळा परिसर दुमदुमून गेला. कृष्ण- राधा यांच्या वेशभूषेत विद्यार्थी- विद्यार्थिनीं सगळ्यांचे लक्ष वेधून घेत होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन शाळेच्या प्राचार्या श्रीम. आर.डी. लोखंडे यांच्या हस्ते झाले. दहीहंडी फोडल्या नंतर विद्यार्थी-विद्यार्थिनींना खाऊवाटप करण्यात आला. परंपरा श्रद्धा आणि उत्सवाचा संगम घडवणारा हा सोहळा विद्यार्थी- विद्यार्थिनी साठी अविस्मरणीय ठरला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीम. मंगल गालफाडे, श्रीम.हिना जुबेरी, श्रीम. प्रीती जाधव या मॅडमनी मेहनत घेतली. या कार्यक्रमात विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

## होळ येथे माजी विशेष पोलिस महानिरीक्षक अंकुशराव शिंदे यांचा सेवापूर्तीनिमित्त गौरव

### जंगी मिरवणूक काढून नागरी सत्कार ; माजी मुख्य न्यायमूर्ती संभाजीराव शिंदे यांची विशेष उपस्थिती

**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील होळचे सुपुत्र, राज्याच्या व्हीआयपी सुरक्षा विभागाचे माजी विशेष पोलिस महानिरीक्षक अंकुशराव शिंदे हे



नुकतेच सेवानिवृत्त झाले. त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी सेवापूर्ती सन्मान सोहळ्याचे आयोजन रविवारी (दि.१७) सकाळी ११ वाजता होळ येथील हनुमान मंदिरात करण्यात आले. या सोहळ्यापूर्वी ग्रामस्थांनी जंगी मिरवणूक काढून त्यांचे उस्फूर्त स्वागत केले.

कार्यक्रमाला राजस्थानचे माजी मुख्य न्यायमूर्ती संभाजीराव शिंदे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. सोहळ्याचे अध्यक्षस्थान सरपंच अश्विनीताई शिंदे यांनी भूषविले. प्रमुख अतिथींमध्ये मांजरा कारखान्याचे माजी कार्यकारी संचालक दत्ता शिंदे, माजी सरकारी वकील अॅड. प्रकाश शिंदे, पुणे सीआयडीचे माजी पोलीस उपअधीक्षक दीपक शिंदे, केंद्रप्रमुख रमेश कांबळे, माजी प्राचार्य डॉ.ज्ञानोबा सरवदे, बारामती अॅग्रोचे प्रबंधक अंकुश ढवारे, मुख्याध्यापक धर्मराज शिंदे, हृदयरोगतज्ज्ञ डॉ.नवनाथ घुगे, डॉ.गणेश ढवारे यांचा समावेश होता. यावेळी मान्यवरांचा होळ ग्रामस्थांच्यावतीने सपत्नीक सत्कार करण्यात आला. ग्रामस्थांच्या पुढाकाराने पार पडलेल्या या सोहळ्यास परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने हजेरी लावली. होळ गावातील दोन उच्चपदस्थ अधिकाऱ्यांचा झालेला हा गौरव सोहळा ग्रामस्थांसाठी अभिमानाचा क्षण ठरला. यावेळी जिल्ह्यातील राजकीय, सामाजिक व प्रशासकीय क्षेत्रातील अनेक मान्यवरही उपस्थित होते.

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • मंगळवार, दि. १९ ऑगस्ट २०२५ • पान ४

# खाकी वर्दीतल्या माणुसकीला माझा सलाम; धनंजय मुंडेंनी केले 'त्या' पोलीस अधिकाऱ्यांचे कौतुक

## कौडगाव हुडा घटनेत डीवायएसपी शिंदे, एपीआय दहिफळे यांनी स्वतः पुर प्रवाहात उतरून वाचवले तरुणाचे प्राण

**परळी । प्रतिनिधी**

परळी तालुक्यातील कौडगाव हुडा – कासारवाडी रस्त्यावरील नदी प्रवाहात एक कार वाहून गेल्याने चार तरुण मध्यरात्री पुरात अडकले होते. याची माहिती मिळताच आ. धनंजय मुंडे यांनी रात्रीतून सूत्र फिरवत चारही बेपत्ता तरुणांच्या तपासासाठी संपूर्ण प्रशासनाला कार्यान्वित केले. चार पैकी तीन तरुणांना वाचवण्यात शासकीय यंत्रणांना व बचाव पथकांना यश आले असून एका तरुणाचा दुर्दैवाने मृतदेह आढळला आहे. या घटनेची माहिती आपल्या सोशल मीडिया हँडलवर शेअर करताना धनंजय मुंडे यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी ऋषिकेश शिंदे व शिरसाळा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गोरक्षनाथ दहिफळे यांच्या कार्याचे कौतुक करत त्यांच्यातील त्यांच्या





खाकीवर्दीच्या आतील माणुसकीला आपला सलाम असल्याचे म्हटले आहे. जवळपास बारा तास पेक्षा अधिक चाललेल्या या बचाव कार्यामध्ये अमर पौळ या तरुणाला वाचवण्यासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी ऋषिकेश शिंदे व सहाय्यक पोलीस निरीक्षक गोरक्षनाथ दहिफळे यांनी स्वतःच आपला जीव धोक्यात घालत पूर्ण प्रवाहामध्ये उडी घेतली. इतकेच नव्हे तर या दोघांनी पूर प्रवाहाच्या विरुद्ध पोहत जाऊन या तरुणाला अत्यंत सुखरूप पद्धतीने बाहेर काढले.

रात्रीच्या भिन्न काळोखामध्ये पूर प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने आपला जीव धोक्यात घालून उडी घेत त्या तरुणाचे प्राण वाचवणाऱ्या डीवायएसपी ऋषिकेश शिंदे व एपीआय गोरक्षनाथ दहिफळे यांच्यातील खाकी वर्दीतल्या ▶ उर्वरित पान २ वर




*माजलगाव भूमिहीन गायरान एकता आंदोलनांच्या वतीने दिनांक ८ ऑगस्ट २०२५ पासून ता. गेवराई येथे महिलासंह भव्य साखळी उपोषण सुरू असून ४० ते ४५ वर्षांपासून कसत असलेल्या गायरान शेत जमीनी नावावर कराव्यात अशी मागणी या आंदोलकांनी केली आहे त्यांच्या या आंदोलनास महात्मा फुले समता परिषद बीड जिल्ह्याच्या वतीने जाहीर पाठींबा दिला या प्रसंगी समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य अँड. सुभाष भाऊ राऊत, युवा प्रदेश अध्यक्ष पॅंथर धम्मपाल कांडेकर, समता परिषद गेवराई तालुकाध्यक्ष बापु गाडेकर यांच्या सह अन्य पदाधिकारी उपस्थित होते*

## बीड जिल्हा वकील संघातर्फे ज्येष्ठ सरकारी विधीज्ञ मा. अँड .उज्वल निकम साहेब यांचा राज्यसभेवर खासदार पदी निवड झाल्याबद्दल सत्कार

**बीड । प्रतिनिधी**

दिनांक १८/०८/२०२५ रोजी ज्येष्ठ विधीज्ञ माननीय उज्वल निकम साहेब यांचा राज्यसभेवर खासदार पदी नियुक्त झाल्यामुळे बीड जिल्हा वकील संघाने त्यांचा सत्कार समारंभ आयोजित केला होता. या सत्कार समारंभ प्रसंगी अध्यक्ष म्हणून बीड जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष माननीय श्री सुभाष गुरुलिंग पिसुरे आप्पा हे होते . यांनी आपले अध्यक्षीय भाषण केले. त्यानंतर माननीय निकम साहेबांचा सत्कार सर्व वकील संघातर्फे करण्यात आला त्यांचा सत्कार बीड जिल्हा वकील संघाचे



अध्यक्ष अँड .सुभाष गुरुलिंग पिसुरे तसेच आप्पा तसेच बीड जिल्हा वकील संघाचे उपाध्यक्ष अँड .रघुराज विष्णुपंत देशमुख साहेब तसेच सचिव अँड .सुभाष रंगनाथ काळे साहेब तसेच सहसचिव अँड .धीरजकुमार कांबळे साहेब तसेच कोषाध्यक्ष अँड .योगेश सुभाष टेकाडे तसेच ग्रंथपाल सचिव अँड .सय्यद अजीम खाजा पाशा आणि महिला प्रतिनिधी अँड.मनीषा अर्जुनराव गडकर ( कुपकर )यांनी सत्कार केला तसेच अँड .अंबादास सोपानराव जाधव पेडगावकर यांनीही माननीय निकम साहेबांचा ▶ उर्वरित पान २ वर

# शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी शिक्षकांच्या बदल्या रद्द करण्याची ग्रामस्थांची मागणी

• लिंबागणेशकर पालकांचा आक्रमक पवित्रा

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत संवर्ग १ ते ४ मधील तब्बल ५ पैकी ४ शिक्षकांच्या प्रशासकीय बदल्या झाल्या असून या निर्णयाला ग्रामस्थांचा तीव्र विरोध आहे. अचानक झालेल्या या बदल्यांमुळे




मुलांचे शैक्षणिक नुकसान होणार असल्याने ग्रामस्थांनी बदल्या तात्काळ रद्द करण्याचे निवेदन शिक्षणमंत्री दादा भुसे, खा. बजरंग सोनावणे, आ. संदिप क्षीरसागर तसेच जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी बीड यांना सादर केले आहे. बदल्या रद्द न झाल्यास पालक रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. ग्रामपंचायत व शालेय व्यवस्थापन समितीचा ठराव– आज (दि. १८) सकाळी ग्राम पंचायत कार्यालयात तसेच शाळेत ▶ उर्वरित पान २ वर

## बार्शीनाका रेल्वे स्टेशनचे काम त्वरीत सुरु करा- खुर्शीद आलम

### उपमुख्यमंत्रीने रेल्वे स्टेशन कृती समितीचे निवेदन लक्षपूर्वक वाचले

**बीड । प्रतिनिधी**



महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित दादा पवार १५ ऑगस्ट निमित्ताने बीडच्या दौऱ्यावर आले होते या यावेळी बार्शी नाका रेल्वे स्टेशन कृती समितीच्या शिष्टमंडळाने उपमुख्यमंत्री यांना भेटून निवेदन दिले आहे, निवेदनात म्हटले आहे की बीडचे रेल्वे स्टेशन बार्शीनाका इमामपूर रोड प्रकाश आंबेडकर नगर येथेच मंजूर आहेत असे असतानाही सदर रेल्वे स्टेशन पालवन येथे म्हणजे बीड शहराच्या ७ ते ८ कि. मि. दुर बांधण्यात आले आहेत, त्यामुळे लोकांची गैरसोय झाली आहे, ▶ उर्वरित पान २ वर

# परळीतील धोकादायक गुंडास MPDA कायद्यान्वये हर्सूल कारागृहात रवानगी

**परळी । प्रतिनिधी**

परळी शहर व परिसरात दहशत निर्माण करून दादागिरी करणाऱ्या शुभम दशरथ जाधव (वय ३२, रा. नैकोटा ता. सोनपेठ, जि. परभणी, ह.मु. विद्यानगर परळी वै.) या धोकादायक गुंडाची MPDA-कायद्यान्वये हर्सूल कारागृह, छत्रपती संभाजीनगर येथे रवानगी करण्यात आली आहे.

बीड जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी



पोलीस अधीक्षक नवनीत कांवत यांनी गुन्हेगारीचे उच्चाटन करण्यासाठी विशेष मोहीम हाती घेतली आहे. याच अनुषंगाने परळी शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रघुनाथ नाचण यांनी शुभम जाधवविरोधात MPDA अंतर्गत प्रस्ताव सादर केला होता. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी १८ ऑगस्ट रोजी आदेश पारित करून त्याला हर्सल कारागृहात ▶ उर्वरित पान २ वर

## श्री योगेश्वरी देवल कमिटीच्या वतीने तहसील कार्यालयात बसवलेल्या जलशुद्धीकरण यंत्रांचे लोकार्पण

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

जल ही जीवन हे या ब्रीदनुसार अंबाजोगाई येथील श्री योगेश्वरी देवल कमिटीने तहसील कार्यालयास उपलब्ध करून दिलेल्या जलशुद्धीकरण यंत्राचे लोकार्पण दि १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून लोकार्पण केले. या जलशुद्धीकरण यंत्राचा (वॉटर प्युरीफायर) लोकार्पण सोहळा अंबाजोगाई तहसील कार्यालयाचे तहसीलदार विलास तरंगे यांच्या उपस्थितीत उपाध्यक्ष



राजकिशोर मोदी, सचिव प्रा अशोक लोमटे , यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी श्री योगेश्वरी देवल कमिटीचे सहसचिव संजय भोसले, कोषाध्यक्ष शिरीष पांडे त्याचबरोबर संतिष लोमटे, प्रवीण दामा, राजाभाऊ लोमटे, अमोल लोमटे, अंबाजोगाई शहराचे तलाठी संजय चव्हाण हे ▶ उर्वरित पान २ वर

# एस.टी. महामंडळात अनियमिततेचा पर्दाफाश

## सहाय्यक यंत्र अभियंता निलेश पवार यांचा अनधिकृत चार्ज व बेकायदेशीर बदली व्यवहार

**बीड । प्रतिनिधी**

एस.टी. महामंडळातील गंभीर गैरव्यवहार आणि अनियमिततेचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. विभागीय कार्यशाळा बीड येथे सहाय्यक यंत्र अभियंता पदावर असलेले श्री. निलेश पवार हे अधिकृतपणे कर्मचारी वर्ग अधिकारी नसतानाही गेल्या अनेक महिन्यांपासून अनधिकृतरीत्या हा पदभार सांभाळत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, तत्कालीन विभाग नियंत्रक श्री. अजयकुमार हिंमत मोरे यांनी पवार यांना तात्पुरता चार्ज दिला होता. परंतु, सद्यस्थितीत कार्यरत विभाग नियंत्रक सौ. अनुजा दुसाने यांनीदेखील कोणतीही दखल न घेता, पवार यांना सतत हा पदभार सांभाळण्याची परवानगी दिली आहे. परिणामी, पवार हे नियमबाह्य पद्धतीने दोन पदे सांभाळत आहेत – एकीकडे सहाय्यक यंत्र अभियंता आणि दुसरीकडे कर्मचारी वर्ग अधिकारी!

भ्रष्टाचारासाठी चार्ज कायम?

फक्त चार्जचीच नाही तर बदली प्रक्रियेतही संशयास्पद व्यवहार उघड झाले आहेत. सेवाज्येष्ठतेला बगल देत, नव्याने नियुक्त झालेल्या काही कर्मचाऱ्यांची काही म हिन्यांतच बदली करून त्यांना इच्छित आगार किंवा विभागीय कार्यालयात नेमणूक करण्यात आली आहे. या कारवाया केवळ पक्षपाती, संशयास्पद आणि भ्रष्टाचाराला पोषक असल्याचा आरोप होत आहे.

वंचित बहुजन आघाडीचा तीव्र आक्रोश या सर्व प्रकारांविरोधात वंचित बहुजन आघाडी – बीड पश्चिमचे जिल्हाध्यक्ष प्रतीक (अजय) सरवदे यांनी तीव्र आक्रोश व्यक्त केला असून, परिवहन मंत्री, राज्यमंत्री, अतिरिक्त मुख्य सचिव, महाव्यवस्थापक तसेच पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अ‍ॅड. प्रकाश उर्फ ▶ उर्वरित पान २ वर

## थोडक्यात...

### अर्जदार शेतकऱ्यांनी सोडत प्रक्रियेसाठी २१ ऑगस्ट रोजी उपस्थित राहण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

राज्यातील शेतकऱ्यांचे केवळ उत्पादन व उत्पादकता वाढविणे हे ध्येय यापुढे न राहता उत्पादित होणाऱ्या शेतमालाची दर्जात्मक सुधारणा करण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर शेतकऱ्यांनी करणे अत्यंत गरजेचे आहे. शेतीशी निगडित घटकांबाबत जगात वेळोवेळी होत असलेल बदल, विकसित होत असलेले तंत्रज्ञान हे शेतकऱ्यापर्यंत त्यांच्या गरजेनुरूप योग्यवेळी पोहचवीने आणि त्यासाठी आवश्यक साहय्य व सोयी सुविधा पुरविणे निकडीचे आहे. कृषी विस्तार कार्यक्रमांमध्ये शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती देण्याकरिता करावयाच्या विविध उपयोजनांसाठी कृषी विभागाकडून राज्यातील शेतकऱ्यांचे प्रदेश दौरे ही योजना राबविण्यात येत आहे. तसेच बीड जिल्ह्यातील महिला १, केंद्र, राज्य कृषी पुरस्कार प्राप्त, पिक स्पर्धा विजेते शेतकरी –१. इतर शेतकरी–३ असे एकूण ५ शेतकऱ्यांचा देशाबाहेरील अभ्यास दौरे याबाबत लक्षांक प्राप्त आहे. त्यानुसार प्रदेश अभ्यास दौऱ्याकरिता इच्छुक शेतकऱ्यांचे प्रस्ताव तालुका कृषी अधिकारी मार्फत मागविण्यात आले असून प्राप्त अर्जाची संख्या लक्षांकापेक्षा जास्त प्राप्त असल्याने प्रदेश अभ्यास दौरा मार्गदर्शक सूचना सन २०२५–२६ नुसार सोडत पद्धत अवलंबावी असे निर्दे शित केले आहे. त्यानुसार प्राप्त अर्जामधून सोडत पद्धतीने निवड करण्यासाठी सोडत प्रक्रिया दिनांक २१ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी एक वाजता जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी कार्यालय बीड येथे करण्यात येणार आहे. अर्जदार शेतकऱ्यांनी सोडत प्रक्रियेसाठी उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे यांनी कळविले आहे.

### मुला मुलींसाठी शासकीय वस्तीगृहात प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज सादर करण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

शैक्षणिक सन २०२५–२६ करिता इतर मागास प्रवर्गातील मुला मुलींसाठी शासकीय वस्तीगृहामध्ये प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरू झाली असून त्यानुसार इतर मागास बहुजन कल्याण विभागाअंतर्गत कार्यरत असलेल्या मुला मुलींच्या वस्तीगृहामध्ये तसेच आधार व स्वयम योजना अंतर्गत १२ वी नंतरच्या अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येणार आहे. शासनाच्या https://hmas.mahait.org या ऑनलाइन पोर्टलवर बी.एम./ बी.कॉम, बी.एस.सी अशा बारावी नंतरच्या अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या पदवी आणि एम.ए./एम.एस.सी असे पदवीनंतरचे पदव्युतर अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना मुदतवाढ दिली आहे. व्यावसायिक अभ्यासक्रम वगळून दिनांक १७ ऑगस्ट २०२५ ते २७ ऑगस्ट २०२५ पर्यंत अर्ज भरून ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रिंट व आवश्यक कागदपत्रे संबंधित वस्तीगृहास विहीत मुदतीत सादर करावे. जिल्ह्यातील इमाव.विमाप्र.विजाभजविद्यार्थ्यानां वसतीगृह आधार व स्वयम योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी ओबीसी मुलामुलींचे वस्तीगृह बीड येथील गृहपाल तसेच सहाय्यक संचालक कार्यालयाशी संपर्क साधावा,असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याणचे सहाय्यक संचालक डी.बी. क्षीरसागर यांनी केले आहे.

### कै. वंसतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष अ‍ॅड निलेश हेलोंडे पाटील बीड दौरा कार्यक्रम

**बीड । प्रतिनिधी**

कै. वंसतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष अ‍ॅड निलेश हेलोंडे पाटील यांचा बीड जिल्हा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. बुधवार दि. २० ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी १२. ०० वाजता छत्रपती संभाजीनगरहून बीडकडे प्रयाण.दुपारी २.०० वाजता विश्राम भवन, बीड येथे आगमन व राखीव. दुपारी ३.०० वाजता तहसीलदार बीड यांनी निश्चित केलेल्या प्रस्तावित चारा लागवडीचे ठिकाणास भेट व पाहणी. दुपारी ४.०० वाजता सोयीनुसार अमरावतीमार्गे काटोलकडे प्रयाण.

### अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करुन शेतकऱ्यांना आर्थिक मदत करा : गणेश बजगुडे पाटील

**बीड । प्रतिनिधी**

मागील आठ दिवसात बीड जिल्ह्यासह तालुक्यातील सर्वच महसुल मंडळात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झालेली असुन २४ तासांपेक्षा जास्त काळ सततचा मुसळधार पाऊस बीड तालुक्यात झालेला असल्याने शेतीला अक्षरशः तलावाचे स्वरूप आलेले आहे. शेतकऱ्यांच्या सोयाबीन, मुग, कापुस, बाजरी, तूर यासारख्या अनेक पिकांचे व पशुधनाचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. एकतर शेतकरी कर्जबाजारीपणामुळे हवालदिल असताना सणासुदीच्या तोंडावर खरिपाच्या पिकांची मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे त्यामुळे तत्काळ नुकसानीचे पंचनामे करुन शेतकऱ्यांना तत्काळ आर्थिक मदत करण्यात यावी अशी मागणी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गणेश दादा बजगुडे पाटील यांनी केली आहे.

### गुत्तेदारीसाठी राजकारण करणाऱ्यांनी नागरिकांची दिशाभूल करू नये : नगरसेवक अ‍ॅड विकास जोगदंड



**बीड । प्रतिनिधी**

१८ ऑगस्ट महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महा अभियान (राज्यस्तर) अंतर्गत बीड नगरपरिषद हद्दीतील प्रमुख रस्त्यांसाठी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचे कडे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी बीड विधानसभा अध्यक्ष डॉ योगेश क्षीरसागर यांनी निधी मागणी करत पाठपुरावा केल्याने जिल्हा सह आयुक्त नगर परिषद प्रशासन विभाग यांनी दिनांक २२ डिसेंबर २०२३ रोजी प्रधान सचिव नगर विकास विभाग नवी–२ यांना तसेच आयुक्त तथा संचालक नगरपरिषद प्रशासन संचालनालय बेलापूर भवन, मुंबई यांचेकडे प्रशासकीय स्तरावरून मान्यता मिळावी याकरिता १,३७,८१,३७,९४२ रु चा प्रस्ताव पाठविला असून सदरील प्रस्तावास लवकरच मान्यता मिळेल आणि शहरातील प्रमुख रस्त्याचा प्रश्न मार्गी लागून बीड शहरातील विकासात्मक सौंदर्यात आणखी भर पडेल परंतु अर्ध्या हळकुंडात पिवळे झालेले निव्वळ ▶ उर्वरित पान २ वर